# मिरा भाईंदर महानगरपालिका
## विशेष स्थायी समिती सभा दि. २२/०५/२००९

मिरा भाईंदर महानगरपालिकेची विशेष स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक २२/०५/२००९ रोजी सभा सुचना क्र. ०४ दि. २१/०५/२००९ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात दुपारी ०१.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स | -- | सभापती |
| २) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | -- | सदस्य |
| ३) | श्री. मिलन वसंत म्हात्रे | -- | सदस्य |
| ४) | सौ. शानु गोहिल | -- | सदस्या |
| ५) | सौ. सुनिता कैलास पाटील | -- | सदस्या |
| ६) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | -- | सदस्य |
| ७) | श्री. टेरी पॉल परेरा | -- | सदस्य |
| ८) | श्रीम. ग्रिटा फॅरो | -- | सदस्या |
| ९) | श्रीम. हेलन गोविंद जॉर्जी | -- | सदस्या |
| १०) | श्री. याकुब ई. कुरेशी | -- | सदस्य |
| ११) | श्री. अनिल दिवाकर सावंत | -- | सदस्य |
| १२) | श्री. जुबेर इनामदार | -- | सदस्य |
| १३) | श्री. मदन उदितनारायण सिंह | -- | सदस्य |
| १४) | श्री. सिंह श्रीप्रकाश जिलेदार | -- | सदस्य |
| १५) | श्री. प्रविण मोरेश्वर पाटील | -- | सदस्य |

**गैरहजर सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. प्रकाश पांडुरंग ठाकूर | -- | सदस्य |

**उपस्थित अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. दादासाहेब आ. पाटील | -- | मुख्य लेखापरिक्षक |
| २) | श्री. शिवाजी बारकुंड | -- | शहर अभियंता, सार्व बांधकाम |
| ३) | श्री. उत्तरेश्वर लोंढे | -- | सहा. संचालक नगररचना |
| ४) | श्री. अजित पाटील | -- | कर निर्धारक व संकलक |
| ५) | श्री. दिपक खांबित | -- | कार्यकारी अभियंता, सार्व. बाधकाम विभाग |
| ६) | श्री. शरद बेलवटे | -- | उप मुख्य लेखाधिकारी |
| ७) | श्री. विजय पाटील | -- | सहा. आयुक्त, परिवहन विभाग |
| ८) | श्री. गोविंद परब | -- | सहा. आयुक्त, सामान्य प्रशासन |
| ९) | श्री. सुनिल यादव | -- | प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. १ |
| १०) | श्री. गणेश पाटील | -- | प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. ४ |
| ११) | श्री. क्लासो फर्नांडीस | -- | मुख्य अग्निशमन अधिकारी |
| १२) | श्री. संजय तायशेटे | -- | विभाग प्रमुख, परवाना |
| १३) | श्री. नरेंद्र पाटील | -- | विभाग प्रमुख, भांडार |
| १४) | श्री. संजय गोखले | -- | सहा. आयुक्त, सामान्य प्रशासन |
| १५) | श्री. राजकुमार कांबळे | -- | मुख्य स्वच्छता निरीक्षक, आरोग्य विभाग |
| १६) | श्री. संदिप शिंदे | -- | मुख्य स्वच्छता निरीक्षक, आरोग्य विभाग |

**गैरहजर अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. अशोक बागेश्वर | -- | उपायुक्त (मु.) |
| २) | श्री. संभाजी पानपट्टे | -- | उपायुक्त, आरोग्य विभाग |

| | | | |
|---|---|---|---|
| ३) | श्री. ओमप्रकाश दिवटे | -- | उपायुक्त अतिक्रमण |
| ४) | श्री. श्रीकांत मोरे | -- | मुख्य लेखाधिकारी |
| ५) | श्री. राजेंद्र मारकड | -- | सहा. नगररचनाकार |
| ६) | श्री. संजय दोंदे | -- | प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. ३ |
| ७) | श्री. मनोहर म्हात्रे | -- | विभाग प्रमुख, वाहन |
| ८) | सौ. सई वडके | -- | विधी अधिकारी |
| ९) | श्री. स्वप्नील सावंत | -- | विभाग प्रमुख, जाहिरात |
| १०) | श्री. सोनारे | -- | प्रशासन अधिकारी, शिक्षण |
| ११) | श्री हेमंत पाटील | -- | प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. १ |
| १२) | श्री. बाबुराव वाघ | -- | विभाग प्रमुख, वन |
| १३) | श्री. डॉ. लहाने | -- | आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग |
| १४) | श्री. किरणे राठोड | -- | उप अभियंता, अतिक्रमण विभाग |
| १५) | श्री. दादासाहेब खेत्रे | -- | विभाग प्रमुख, जकात |
| १६) | श्री. रामचंद्र असोदेकर | -- | विभाग प्रमुख, सुवर्ण जयंती |
| १७) | श्री. हंसराज मेश्राम | -- | विभाग प्रमुख, वन विभाग |
| १८) | श्री. नरेंद्र चव्हाण | -- | जनसंपर्क अधिकारी |
| १९) | श्री. नागेश इरकर | -- | विभाग प्रमुख, वन विभाग |
| २०) | श्री. राज घरत | -- | सिस्टीम ॲनालीस्ट, नागरी सुविधा केंद्र |
| २१) | श्रीम. चारुशिला खरपडे | - | आस्थापना विभाग |

**मा.सभापती :-**

सचिवांनी सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष स्थायी समिती सभा शुक्रवार दि. २२/०५/२००९ रोजी दुपारी १.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात विशेष स्थायी समिती सभा सुचना क्र. ०४, दि. २१/०५/२००९ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. ५, परिवहन उपक्रमासाठी केंद्रशासनाच्या JNNURM कार्यक्रमा अंतर्गत ३०० बसेस खरेदी करणेकरीता डी. पी. आर. मंजुरीबाबत.

**मिलन म्हात्रे :-**

केंद्र शासनाच्या JNNURM कार्यक्रमा अंतर्गत शहरी भागातील पायाभूत सुविधा करीता प्रकल्पांना केंद्र व राज्य शासनामार्फत अनुदान देण्यात येते. या योजने अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका सुध्दा नागरी संकुलनासमवेत समाविष्ट करण्यात आलेले आहे. केंद्र शासनाच्या JNNURM कार्यक्रमा अंतर्गत न्यू दिल्ली येथे झालेल्या बैठकीमध्ये शहरी दळणवळण "अर्बन ट्रान्सपोर्ट" या सदराखाली पब्लीक ट्रान्सपोर्ट करीता बसेस घेण्याचा प्रस्ताव अनुदानास प्राप्त ठरवू शकतो. या चर्चेच्या अनुषंगाने मिरा भाईंदर परिवहन सेवेकरीता एकूण २५० बसेस खेरदी करण्याचा प्रस्ताव व त्याचप्रमाणे सविस्तर अहवाल केंद्र सरकारकडे सादर करणे संयुक्तीक ठरणार आहे. सरासरी एक बस खरेदी करण्याकरीता रु. २५ लक्ष (प्रत्येक बस खरेदी करतेवेळीचे बाजार मुल्यानुसार होणारी रक्कम) खर्च येत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सुमारे रु. २५ लक्ष इतकी आदारभूत किंमत घेवून एकूण २५० बसेस खरेदी करण्याकरीता रु. ६२.५० कोटी इतका खर्च अपेक्षीत आहे. याबाबत केंद्र शासनाच्या JNNURM कार्यक्रमा अंतर्गत अनुदानाकरीता सविस्तर तांत्रिक तपशिलासह प्रकल्प अहवाल तयार करण्याकरीता तज्ञ सल्लागार यांची नेमणूक करुन त्यांचे मार्फत सविस्तर अहवाल तयार करण्यात येईल. तद्नंतर प्रकल्प अहवाल राज्यस्तरीय समन्वय संस्था एम.एम.आर.डी.ए. यांच्यामार्फत राज्य शासनास सादर करता येईल. राज्य शासनाच्या सुकाणू समितीच्या मंजूरी नंतर सदर प्रस्ताव केंद्र शासनाच्या JNNURM कार्यक्रमा अंतर्गत केंद्रीय सी.एस. ॲन्ड एम.एस. यांच्याकडे मंजुरीसाठी पाठविण्यात येईल. केंद्र शासनाची मंजुरी प्राप्त झाल्यास सुमारे ५० टक्के अनुदान प्राप्त होवू शकेल. (केंद्र शासनाचे ३५ टक्के व राज्य शासनाचे १५ टक्के)

सब प्रशासनातर्फे तांत्रिक व कायदेशीर बाबी तपासले असता योग्य असल्याचे गृहित धरुन ही स्थायी समिती सभा मिरा भाईंदर शहरासाठी परिवहन सेवेसाठी एकूण २५० बसेस खरेदी करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाचा JNNURM कार्यक्रमा अंतर्गत मंजुरीसाठी पाठविण्यात व त्यासाठी येणारा खर्च रु. ६२.५० कोटी तसेच सल्लागार फी रु. ४० लक्ष (सेवा कर वगळून) देणेस प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे. या प्रकरणी प्राप्त झालेला अहवाल पाहता व या योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून बस खरेदी करणेकरीता असलेला अल्प कालावधी असल्याने हे काम वेळेत व मुदतीत पूर्ण होणे अत्यावश्यक असल्याने इतिवृत्त मंजुरीची वाट न पाहता प्रशासनाने पुढील कार्यवाही करावी अशी ही स्थायी समिती सभा ठरवीत आहे.

**शानु गोहिल :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-**

केंद्र शासनाच्या JNNURM कार्यक्रमा अंतर्गत शहरी भागातील पायाभूत सुविधा करीता प्रकल्पांना केंद्र व राज्य शासनामार्फत अनुदान देण्यात येते. या योजने अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका सुध्दा नागरी संकुलनासमवेत समाविष्ट करण्यात आलेले आहे. केंद्र शासनाच्या JNNURM कार्यक्रमा अंतर्गत न्यू दिल्ली येथे झालेल्या बैठकीमध्ये शहरी दळणवळण "अर्बन ट्रान्सपोर्ट" या सदराखाली पब्लीक ट्रान्सपोर्ट करीता बसेस घेण्याचा प्रस्ताव अनुदानास प्राप्त ठरवू शकतो. या चर्चेच्या अनुषंगाने मिरा भाईंदर परिवहन सेवेकरीता एकूण २५० बसेस खेरदी करण्याचा प्रस्ताव व त्याचप्रमाणे सविस्तर अहवाल केंद्र सरकारकडे सादर करणे संयुक्तीक ठरणार आहे. सरासरी एक बस खरेदी करण्याकरीता रु. २५ लक्ष (प्रत्येक बस खरेदी करतेवेळीचे बाजार मुल्यानुसार होणारी रक्कम) खर्च येत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सुमारे रु. २५ लक्ष इतकी आदारभूत किंमत घेवून एकूण २५० बसेस खरेदी करण्याकरीता रु. ६२.५० कोटी इतका खर्च अपेक्षीत आहे. याबाबत केंद्र शासनाच्या JNNURM कार्यक्रमा अंतर्गत अनुदानाकरीता सविस्तर तांत्रिक तपशिलासह प्रकल्प अहवाल तयार करण्याकरीता तज्ञ सल्लागार यांची नेमणूक करुन त्यांचे मार्फत सविस्तर अहवाल तयार करण्यात येईल. तद्नंतर प्रकल्प अहवाल राज्यस्तरीय समन्वय संस्था एम.एम.आर.डी.ए. यांच्यामार्फत राज्य शासनास सादर करता येईल. राज्य शासनाच्या सुकाणू समितीच्या मंजूरी नंतर सदर प्रस्ताव केंद्र शासनाच्या JNNURM कार्यक्रमा अंतर्गत केंद्रीय सी.एस. ॲन्ड एम.एस. यांच्याकडे मंजुरीसाठी पाठविण्यात येईल. केंद्र शासनाची मंजुरी प्राप्त झाल्यास सुमारे ५० टक्के अनुदान प्राप्त होवू शकेल. (केंद्र शासनाचे ३५ टक्के व राज्य शासनाचे १५ टक्के)

सब प्रशासनातर्फे तांत्रिक व कायदेशीर बाबी तपासले असता योग्य असल्याचे गृहित धरुन ही स्थायी समिती सभा मिरा भाईंदर शहरासाठी परिवहन सेवेसाठी एकूण २५० बसेस खरेदी करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाचा JNNURM कार्यक्रमा अंतर्गत मंजुरीसाठी पाठविण्यात व त्यासाठी येणारा खर्च रु. ६२.५० कोटी तसेच सल्लागार फी रु. ४० लक्ष (सेवा कर वगळून) देणेस प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे. या प्रकरणी प्राप्त झालेला अहवाल पाहता व या योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून बस खरेदी करणेकरीता असलेला अल्प कालावधी असल्याने हे काम वेळेत व मुदतीत पूर्ण होणे अत्यावश्यक असल्याने इतिवृत्त मंजुरीची वाट न पाहता प्रशासनाने पुढील कार्यवाही करावी अशी ही स्थायी समिती सभा ठरवीत आहे.

**मा. सभापती :-**

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, कालसुध्दा पावसाळ्या पूर्वीची तयारी म्हणून पालकमंत्री यांनी ठाण्याला मिटींग लावलेली. तर, आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेची काय परिस्थिती आहे? पावसाळ्यापूर्वी नाले साफसफाई सुरु केली का?

**मा. आयुक्त :-**

त्या त्या एरियामध्ये विभागवार जे सदस्य आहेत. त्यांना आम्ही घेवून दाखवायला लागलो. म्हणजे त्यावेळची परिस्थिती आणि आता केलेली. म्हणजे हायवे पट्ट्यातल्या काउंन्सीलरला सांगितले. कामे सुरु केलेली आहेत आणि ७० टक्के कामे झालेली आहेत. त्यामध्ये बदल एवढाच केलेला आहे की, ज्या चार ठिकाणी पाणी भरत होत. प्रत्येक पावसाळ्यात पाणी भरते. त्या ठिकाणी १ अग्निशमन, १ ॲम्ब्युलन्स, २० कामगार आणि साहित्यनिशी तिथेच थांबविणार आहे.

**अनिल सावंत :-**

२४ तासासाठी.

**मा. आयुक्त :-**

प्रभाग समिती प्रमाणे करुन उपयोग नाही पाणी जिथे थांबते, तिथेच माणसं थांबवायचे.

**अनिल सावंत :-**

आपण महानगरपालिकेची हेल्पलाईन वगैरे चालू करणार आहे का?

**मा. आयुक्त :-**

हेड ऑफीसला, एक प्रभाग समितीला आणि तुबलेल्या ठिकाणी.

**अनिल सावंत :-**

२४ तास हेल्पलाईन चालू राहणार का?

**मा. आयुक्त :-**

नविन वॉकी-टॉकी वायरलेस सिस्टम मंजूर झालेली आहे. सव्वालाख रु. सेंट्रल गर्व्हमेंटला भरायचे आहे. ते भरल्यानतर घ्यायचे. वॉकी-टॉकी सध्या शंभरच घ्यायचे आहे. २०० ची मंजूरी आणलेली आहे. म्हणजे एक अधिकारी जर बोलायला लागला तर, कुठे कचरा तुंबलेला आहे? पाणी कुठे तुंबलेल आहे? हे सगळ्या

१०० जणांना ऐकू येईल. म्हणजे चुकून बेकायदेशीर बांधकाम तोडू नका असे तरी सांगितले तरी ते १०० जणांना समजणार आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ह्याचा प्रकार असा होईल की, जिकडे पाहिजे ते सुध्दा तोडणार नाही. आदेश आलेला आहे. साहेब, तुम्ही एक बोलला की, मागच्या वेळी हायवे वरुन आयत्या वेळेला पाण्याचे लोंढे आले. मग, हायवेचे डिवायडर वगैरे तोडायला लागले. सुदाम गायकवाड साहेब त्यावेळी आयुक्त होते. त्या हायवेच्या ठिकाणच्या मो-या आहेत......

**मा. आयुक्त :-**

शहरात कल्वर्ट साफ करायला चालू केलेले आहे. त्यापैकी सहा कल्वर्ट मोकळे झालेले आहे. हायवे ॲथोरीटीलाच बोलावून सांगितले आहे आणि त्यांचे जेसीबी आणि पोकलन चालू आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब ते नाही. आता त्याच्या व्यतिरिक्त जे नाले आहेत ना, ते तबेले वगैरे सगळे आहे तिथे शेण असते. ते अजून तसेच आहे. शेण असे आहे की, थर्माकॉल सारखे तरंगते आणि ते जावून ब्लॉकेज करते. दहिसर चेक नाक्याच्या इकडची हायवेची विंडो मोठी आहे. त्याच्यानंतर त्यांच्या पलिकडे म्हणजे ऑथोरीटीच्या जागी बाहेर संपूर्ण अतिक्रमण नाला छोटा झाला आहे. मी तीन वर्षापासून सांगतो आहे. तिथे अजून नाला मोकळा केलेला नाही.

**मा. आयुक्त :-**

मोकळा केला. फक्त मोठा करायचा बाकी आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्यालाच मोकळा करायचा म्हणतो आणि आपले अतिक्रमण किती तोडले? तुम्ही एकही लिस्ट दिलेली नाही की, नाल्यामध्ये अतिक्रमण वाढलेली आहे. आम्ही तक्रारी करतो, लोक वाढवत चालले. तिथे रुम खचलेले आहेत. माझ्याकडे फोटो आहेत. ऑथोरीटीला तुम्ही सांगितले. पण, डिसीजन घ्यायला कोणी तयार नाही. आपल्याकडे गेल्या तीन वर्षात सर्व नाल्याचे मोजमाप आहेत. नाला किती विर्थ होता. २००४ किंवा त्याच्याही अगोदर, तुमच्या बांधकाम विभागाकडे नाल्याची रुंदी सगळीकडे, आपल्याकडे ऑफीसमध्ये रेडी आहे. त्याच्याच मागे आम्ही मार्कींग करुन घेतली होती. त्या मार्कींगच्या पलिकडे २०-२० फूट लोकांनी बांधकामे करुन ते सगळे नाले बुजवलेले आहेत.

**मा. आयुक्त :-**

आता जे ॲक्जेस्टींग नाले आहेत. त्या नाल्यामध्ये हायवे पट्ट्यातले संजय गांधी गार्डन मधून जे पाणी येते. त्या एरियामध्ये कमीत कमी या बाजूला ५ फूट त्या बाजूला ५ फूट असे १० फूट यावेळेला आम्ही वाढवलेले आहे. प्रत्येक माळा आणि गावातले जे कन्स्ट्रक्शन केलेले आहेत ते काय वाढवायला जागा नाही. परंतु, ज्या ठिकाणी वाढवणे शक्य आहे, प्रत्येक ठिकाणी दोन्ही बाजूंनी ५-५ फूटांनी वाढवलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

पण साहेब, आता जिकडे गावात केले कोणी लहान लहान बांधलेली आहे. कोणी कंपाउंड वॉल बांधलेले आहे ते सगळे आपल्याला काढायला काय होते.

**मा. आयुक्त :-**

कुठले कंपाउंड?

**मिलन म्हात्रे :-**

त्या पेणकरपाड्याच्या इथून मी स्वतः फेरी मारली. वाढवायला तुम्ही जर इच्छा केली तर सगळ होईल. साहेब, आपण पाच माळ्याची बिल्डींग तोडू शकतो. तर, नैसर्गिक नाले का मोकळे करु शकत नाही. मिठी नदीवरती तुमच्याकडे भरपूर जजमेन्ट आहेत.

**मा. आयुक्त :-**

जी जी बांधकामे नाल्यामध्ये येतात. ती सगळी तोडायची कामे चालू आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

माझ्या इकडे चालू नाही केले?

**मा. आयुक्त :-**

फक्त तुमच्या इकडेच राहिलेले आहे. म्हणून मी दुपारी येतो.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्हाला यायची काय गरज आहे. तुमच्या हाताखालचे जे अधिकारी आहेत. त्यांच्याकडे स्थानिक नगरसेवक तक्रारी करतात.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त साहेब, रेल्वे समांतर हे मिरारोडला जो नाला आहे. त्याला उघाड्या करीता रेल्वेकडून मागणी केली होती. त्याची काही तरी मागणी आली नाही ना, खांबित साहेब.

**मा. आयुक्त :-**

मा. सभापती साहेब, आपण एकसारखा त्याचा पाठपूरावा करुनही आपल्याकडे मंजूरी मिळत नव्हती. पण, त्यादिवशी आम्ही चिफ इंजिनिअरला फोनवरच मॅसेज दिला की, आमचे राष्ट्रवादी, शिवसेना, बीजेपी, कॉंग्रेस या लोकांनी रेल रोको आंदोलन करणार आहेत. जर परवानगी नाही मिळाली तर, आम्ही चार दिवसात परवानगी द्या. नाही तर ते रेल रोको आंदोलन करणारे पत्र माझ्याकडे दिलेले आहे. ते तुमच्याकडे मी शिफारस करतो. तुम्ही काय निर्णय घ्यायचा तो घ्या. सध्या दुपारी ४ वा. आम्ही परवानगी देतो आणि त्यांना पाठीमागे घ्यायला सांगा म्हणून सांगितले. त्यांच्या ऑफीसला लाईनीत बसून चिठ्ठी पाठवून भेटण्यापेक्षा त्यांना फोनवरच सांगितले. तर, त्यांनी परवानगी दिली असे समजले. परवानगी आल्यानंतर कामाला सुरु.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, या नालेसफाईबाबत.....

**जुबेर इनामदार :-**

आता आयुक्त साहेबांनी एवढी चांगली भूमिका घेतली. त्याचा पाठपुरावा करुन अंमलबजावणी करुया ना. म्हणजे आपला वर्षानुवर्षे पाणी भरण्याचा विषय आहे तो सॉल्व होतो.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, मिरारोड, शांतीनगर आणि भाईंदर पूर्वचा भाग असा आहे तो खाडी लगत आहे. त्यामुळे हायटाईट चालू असतो तो रिव्हर्स वसाहती मध्ये घुसतो. तर त्याच्यासाठी काय प्रोव्हीजन केलेली आहे?

**मा. आयुक्त :-**

उघाड्या आहेत ना.

**अनिल सावंत :-**

उघाड्या नाही आहेत. कारण आजची परिस्थिती अशी हायटाईट रस्त्यामध्ये घुसतात. तर त्या उघाड्या आहेत का? कारण गेल्यावर्षी आम्ही पोलीस चौकीतून.....

**दिपक खांबित :-**

आपण तिकडे झडपा वगैरे लावलेले आहे. पण ते काय केले की, मासे वगैरेचे भरतीच्या वेळी झडपा तोडतो. तर ते आता आपण रिपेअरींग करुन घ्यायला लावले.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्याकडे ऑपरेटर वगैरे कोण नेमले की नाही? ह्याच्यावर कोणाचे लक्ष आहे का? आपण आता सोनागरच्या येथे उघाड्या लावल्या तिथे कोणाचे लक्षच नसते. म्हणजे आपण कोण तरी ऑपरेटर पाहिजे की नाही. लाखो रु. चे आपण खर्च करु. घोडबंदर किल्ल्याच्या इथे उघाडी आहे, नवघरला एक आहे. १०-१२ तरी उघाड्या असतात आणि ऑपरेटर कोणीच नसतो. तर, किमानपक्षी या पावसाळ्यापर्यंत तरी ऑपरेटर पाहिजे.

**प्रविण पाटील :-**

मागच्या चार महिन्यापूर्वी झडपा लावलेल्या.

**मिलन म्हात्रे :-**

आणि रिपोर्टींग करायला सांगा.

**मा. सभापती :-**

सभा संपली असे मी जाहिर करतो.

**प्रकरण क्र. ५ :-**

परिवहन उपक्रमासाठी केंद्रशासनाच्या JNNURM कार्यक्रमा अंतर्गत ३०० बसेस खरेदी करणेकरीता डी. पी. आर. मंजुरीबाबत.

**ठराव क्र. ०९ :-**

केंद्र शासनाच्या JNNURM कार्यक्रमा अंतर्गत शहरी भागातील पायाभूत सुविधा करीता प्रकल्पांना केंद्र व राज्य शासनामार्फत अनुदान देण्यात येते. या योजने अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका सुध्दा नागरी संकुलनासमवेत समाविष्ट करण्यात आलेले आहे. केंद्र शासनाच्या JNNURM कार्यक्रमा अंतर्गत न्यू दिल्ली येथे झालेल्या बैठकीमध्ये शहरी दळणवळण "अर्बन ट्रान्सपोर्ट" या सदराखाली पब्लीक ट्रान्सपोर्ट करीता बसेस घेण्याचा प्रस्ताव अनुदानास प्राप्त ठरवू शकतो. या चर्चेच्या अनुषंगाने मिरा भाईंदर परिवहन सेवेकरीता एकूण २५० बसेस खेरदी करण्याचा प्रस्ताव व त्याचप्रमाणे सविस्तर अहवाल केंद्र सरकारकडे सादर करणे संयुक्तीक ठरणार आहे. सरासरी एक बस खरेदी करण्याकरीता रु. २५ लक्ष (प्रत्येक बस खरेदी करतेवेळीचे बाजार मुल्यानुसार होणारी रक्कम) खर्च येत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सुमारे रु. २५ लक्ष इतकी आदारभूत किंमत घेवून एकूण २५० बसेस खरेदी करण्याकरीता रु. ६२.५० कोटी इतका खर्च अपेक्षीत आहे. याबाबत केंद्र शासनाच्या JNNURM कार्यक्रमा अंतर्गत अनुदानाकरीता सविस्तर तांत्रिक तपशिलासह प्रकल्प अहवाल तयार करण्याकरीता तज्ञ सल्लागार यांची नेमणूक करुन त्यांचे मार्फत सविस्तर अहवाल तयार करण्यात येईल. तद्नंतर प्रकल्प अहवाल राज्यस्तरीय समन्वय संस्था एम.एम.आर.डी.ए. यांच्यामार्फत राज्य

शासनास सादर करता येईल. राज्य शासनाच्या सुकाणू समितीच्या मंजूरी नंतर सदर प्रस्ताव केंद्र शासनाच्या JNNURM कार्यक्रमा अंतर्गत केंद्रीय सी.एस. ॲन्ड एम.एस. यांच्याकडे मंजुरीसाठी पाठविण्यात येईल. केंद्र शासनाची मंजुरी प्राप्त झाल्यास सुमारे ५० टक्के अनुदान प्राप्त होवू शकेल. (केंद्र शासनाचे ३५ टक्के व राज्य शासनाचे १५ टक्के)

सब प्रशासनातर्फे तांत्रिक व कायदेशीर बाबी तपासले असता योग्य असल्याचे गृहित धरुन ही स्थायी समिती सभा मिरा भाईंदर शहरासाठी परिवहन सेवेसाठी एकूण २५० बसेस खरेदी करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाचा JNNURM कार्यक्रमा अंतर्गत मंजुरीसाठी पाठविण्यात व त्यासाठी येणारा खर्च रु. ६२.५० कोटी तसेच सल्लागार फी रु. ४० लक्ष (सेवा कर वगळून) देणेस प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे. या प्रकरणी प्राप्त झालेला अहवाल पाहता व या योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून बस खरेदी करणेकरीता असलेला अल्प कालावधी असल्याने हे काम वेळेत व मुदतीत पूर्ण होणे अत्यावश्यक असल्याने इतिवृत्त मंजुरीची वाट न पाहता प्रशासनाने पुढील कार्यवाही करावी अशी ही स्थायी समिती सभा ठरवीत आहे.

**सुचक :- श्री. मिलन म्हात्रे** **अनुमोदक :- श्रीम. शानु गोहिल**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

आजची सभा संपली असे मी जाहिर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दु. ०१.३० वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**